## नियमीत दिवाणी मुकदमा क्र.४३४/२०१९ मधील
## निशाणी क्र.२४ वर आदेश

**CNRNO.MHLA110005772019**

१. अर्जाचे अवलोकन केले. प्रतिवादीतर्फे म्हणणे दाखल करण्यात आलेला नाही. पक्षकारांतर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. सदरचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र.१ च्या वारसांना प्रकरणात समाविष्ट करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र.१ हे दि.२४/०८/२०२० रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. सदरचा दावा मिळकतीची मालकी घोषीत करुन मिळण्याकरीता व निरंतर मनाई हुकूमाकरिता दाखल केलेला आहे. सदर प्रकरणातील पक्षकारांमधील वादाचे स्वरुप विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, वादीला प्रतिवादी क्र.१ च्या वारसांविरुद्ध दावा पुढे चालविण्याचा अधिकार आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज वादीने मुदतीत दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### <u>आ दे श</u>

१. नि.क्र.२४ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ च्या वारसांना दाव्यामध्ये समाविष्ट करुन दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत दाखल करावे.

Digitally signed by Shivakant Machhindra Gourgond
Date: 2020.12.10 16:44:31 +0530

दि. ०८.१२.२०२० (शि. म. गौरगोंड)

सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.